# Gramin Krishi Mausam Sewa

Experimental Block Level Agromet Advisory Bulletin
(A Joint Initiative of IMD & ICAR )

# Agromet Advisory Bulletin

**Date : 09-10-2020**

**Weather Forecast of KAMPTEE Block in NAGPUR(Maharashtra) Issued On :2020-10-09(Valid Till 08:30 IST of the next 5 days)**

| Date (y-m-d) | Rainfall (mm) | Tmax (°C) | Tmin (°C) | RH I (%) | RH II (%) | Wind Speed (kmph) | Wind Direction (Degree) | cloud cover (Octa) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2020-10-10 | 4.9 | 31.1 | 23.8 | 88 | 60 | 4.0 | 68 | 6 |
| 2020-10-11 | 5.8 | 31.1 | 24.2 | 90 | 63 | 7.0 | 20 | 7 |
| 2020-10-12 | 21.6 | 30.7 | 23.8 | 91 | 69 | 11.0 | 26 | 8 |
| 2020-10-13 | 2.8 | 31.0 | 23.3 | 89 | 62 | 14.0 | 63 | 8 |
| 2020-10-14 | 24.3 | 30.0 | 24.1 | 93 | 69 | 11.0 | 63 | 7 |

## Weather Summary/Alert:

In Kamathee block, as per forecast given by, RMC, Nagpur, weather will be partially to mostly cloudy during next five days. Light to moderate rainfall from 10th October, 2020 to 14th October, 2020 is forecasted in block.

कामठी तालुक्यामध्ये, प्रादेशिक हवामान केंद्र नागपूर च्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस हवामान अंशतः ढगाळ ते मुख्यतः ढगाळ राहील. त्याचबरोबर दिनांक १० ऑक्टोबर २०२० ते १४ ऑक्टोबर २०२० पर्यंत तालुक्यात हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## General Advisory:

Sowing of rabi crop should not be done in a hurry. Sowing should be done only after 15th October when the soil is in Wafasa condition. As the light moderate rainfall at many to most places in next five days, it is advice to postpone the harvesting of crops, intercultural operation, spraying of agrochemicals and fertilizer application in standing crop. This should be done according to local weather condition during dry and clean weather. It is advice to store the harvested produce in safe and dry

रब्बी हंगामातील घ्यावयाच्या पिकाच्या पेरणीस घाई करू नये, १५ ऑक्टोबर नंतर जमीन वाफसा आल्यानंतरच पेरणी करावी. पुढील पाच दिवस बहुतांश ते सर्वत्र ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असल्याने पिकाची काढणी, फळबागा, भाजीपाला पिके आणि कपाशी तसेच इतर पिकामध्ये फवारणी, आंतरमशागतीची कामे आणि उभ्या पिकात खते देण्याची पुढे ढकलावी. सदर कामे स्थानिक हवामान परिस्थिती बघून कोरडा आणि उघाडीचा दिवस पाहून करावी. काढणी केलेल्या पिकाची तत्काळ कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी ताडपत्रीच्या सहाय्याने झाकावे/साठवणूक करावी.

## SMS Advisory:

Care should be taken by farmers of self and cattles thunderstorm accompanied with lightning at isolated places on 09, 10 & 11 October is forecasted.

दिनांक ०९, १० आणि ११ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने स्वतःची आणि जनावरांची काळजी घ्यावी.

## Crop Specific Advisory:

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| BENGAL GRAM/ CHICK PEA | Deshi varieties and seed rate of chickpea for sowing- Hirawa Chafa (AKGS-1), Vijay and ICCV-10 (50-60 kg/ha seed), PKV Harita (AKG- 9303-12) and JAKI- 9218 (75-85 kg/ha seed), Kabuli varieties and seed rate of chickpea, PKV Kabuli-2 & PKV Kabuli-4 (110-115 kg/ha seed), Pink chickpea variety and seed rate, Gulak-1 (75-85 kg/ha seed) are recommended for sowing up to second fortnight of October to 15th November and sowing of PKV Kanchan (AKG- 1909) (50-60 kg/ha seed) variety of chickpea up to second fortnight of October to 15th November. |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | हरभरा पिकाचे पेरणीकरिता देशी वाण आणि बियाणे दर – हिरवा चाफा (एकेजीएस- १), विजय आणि आयसिसिव्ही- १० (५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर), पिकेव्ही हरिता (एकेजी- ९३०३- १२) आणि जाकी ९२१८ (७५- ८५ किलो बियाणे प्रती हेक्टर बियाणे), काबुली वाण आणि बियाणे दर पिकेव्ही काबुली- २ आणि पिकेव्ही काबुली- ४ (११०- ११५ किलो बियाणे प्रती हेक्टर), गुलाबी हरभरा वाण गुलक- १ (७५-८५ बियाणे प्रती हेक्टर) या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५- ३० नोव्हेंबर पर्यंत पेरणी करावी. पिकेव्ही कांचन (एकेजी- १९०९) या वाणाची ५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत करावी. |
| BENGAL GRAM/ CHICK PEA | Before sowing of gram seed, seed treatment should be done of 5 gm of Trichoderma or 2 gm of Thirum + 2 gm of Carbendazim per kg of seed, followed by 250 gm of Rhizobium (nitrogen fixing bacteria) and 250 gm of P. S. B. (Phosphorus Dissolving Bacteria) seed treatment should be done by mixing cold solution of jaggery per 10 kg seed. After seed treatment the seeds should be dried in the shade for an hour and then sown. |
| | हरभरा बियाण्यास पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ५ ग्राम ट्रायकोडर्मा किंवा २ ग्राम थायरम + २ ग्राम कार्बेन्डाझिम बीजप्रक्रिया, यानंतर २५० ग्राम रायझोबियम (नत्र स्थिरीकरण करणारे जिवाणू) आणि २५० ग्राम पी. एस. बी. ( स्फुरद विरघळविणारे जिवाणू) प्रती १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणात मिसळून बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. |
| SORGHUM (JOWAR/GREAT MILLET) | Sowing of rainfed rabi sorghum (PKV Kranti, Phule Yashoda, Maldandi) should be done first fortnight of October. Seed treatment should be done with Azatobacter+ PSB (each 25 g / kg seed) and biofungicide Trichoderma @ 4 g per kg seed. |
| | रब्बी पिकामध्ये रब्बी ज्वारी या पिकाचा समावेश करावयचा असल्यास मालदांडी, फुले यशोदा, पिकेव्ही - क्रांती, या वाणांची निवड करावी. पेरणी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्या पर्यंत करावी. पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्पुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी अझोटोबाक्टेर व पीएसबी जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. |
| COTTON | In the view of current rainy and cloudy condition, It is recommended to spray alpha NAA 4.5% SL@ 4 ml /10 litres of water to avoid natural shedding of squares and flowers of cotton and it is also suggested to undertake spray of chlormequat chloride 50% SL @ 1-2 ml per 10 litres of water to restrict the excess vegetative growth and to induce reproductive growth of cotton. |
| | सद्य परिस्थितीतील ढगाळ आणि पावसाच्या वातावरणामुळे, कपाशीमध्ये पाते आणि फुल गळ दिसून आल्यास अल्फा एनएए ४.५ टक्के एसएल ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्याचबरोबर कपाशीमध्ये अतिरिक्त शाखीय/कायिक वाढ रोखण्यासाठी आणि पाते/फुले धरण्याच्या वाढीसाठी क्लोरमेक्वेट क्लोराइड ५० टक्के एसएल @ १-२ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| COTTON | In the view of current rainy and cloudy condition, for the management of Myrothecium leaf spot/grey mildew/ Corynespora leaf spot/leaf spot/anthracnose/external boll rot, it is advised to undertake foliar spray Carbendazim 50 WP @ 20 g or Kresoxim-methyl 44.3 SC @10 ml or Pyraclostrobin 5% + Metiram 55% WG or Propiconazole 25 EC @10 ml or Propineb 70 WP@25-30 g or Azoxystrobin 18.2% w/w+Difenoconazole11.4% w/w SC@ 10 ml or Fluxapyroxad 167 g/l + Pyraclostrobin 333 g/l SC@ 6 g in 10 litres of water is recommended. |
| | कपाशीवरील मायरोथेशियम बुरशीजन्य ठिपके/दह्या/कोरीनिस्पोरा बुरशीजन्य ठिपके/ पानावरील ठिपके, अँथ्रॅकनोज आणि बाह्य बोंडसड या बुरशीजन्य रोगांच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम ५० डब्लूपी २० ग्राम किंवा क्रेसोक्झीम- मिथिल ४४.३ एससी १० मिली किंवा मेटिराम ५५ % + पायराक्लोस्ट्रॉबिन ५ % डब्ल्यूजी @ २० ग्रॅम १० किंवा प्रोपिकोनाझोल २५ % ईसी @ १० मिली किंवा प्रोपिनेब ७० % डब्ल्यूपी @ २५-३० ग्रॅम किंवा आझोक्सीस्ट्रोबिन १८.२ % ww + डायफेनकोनाझोल ११.४ % ww एससी १० मिली किंवा फ्लूक्सापायरोक्साड १६७ g/l + पायराक्लोस्ट्रॉबिन ३३३ g/l एससी ६ ग्राम १० लिटर पाण्यात मिसळून उघाडीचा दिवस पाहून फवारणी करावी. |
| COTTON | In the view of present cloudy and rainy weather, if the sucking pest reaches above ETL, spray Flonicamid 50 WG 4 gm or Dinotefuran 20 % SG 3g/10 lit of water. Erect 2 Pheromone traps per hectare for monitoring of Pink bollworm infestation. Rosette flowers should be plucked and destroyed. in the view of present cloudy condition if Pink bollworm incidence crosses ETL (10% infestation), spray Profenophos 50 EC @ 20 ml or Thiodicarb 75 WP @ 20 g per 10 litre of water. |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | सद्य स्थितीत ढगाळ आणि पावसाच्या हवामानामुळे जर रसशोषक किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास फ्लोनिक्यामिड ५० डब्ल्यूजी. ४ ग्राम किंवा डीनोटेफ्युरान २० % एसजी. ३ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गुलाबी बोंड अळीच्या निरीक्षणासाठी प्रती एकर दोन फेरोमोन सापळे लावावेत. प्रादुर्भाव ग्रस्त डोमकळी काढून नष्ट कराव्या. सद्यस्थितीतील ढगाळ वातावरणामुळे गुलाबी बोंड अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठल्यास (१० % नुकसान) प्रोफेनोफॉस ५० % ईसी २० मिली किंवा थायोडीकार्ब ७५ डब्लू.पी. २० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| RICE | In the view of current rainy and cloudy condition, Although rice crop is prone to plant hoppers, Azadiractin 0.15% (1500 ppm) @ 30 ml or Metarhizium anisopliae as a bio-insecticide @ 2.5 kg/ha. or Imidacloprid 17.8 SL. @ 2.2 ml. or Fipronil 5 SC@ 20 ml. or Flonicamid 50 WG @ 3.0 gm or Etofenprox 10% EC @ 10 to 15 ml. Mix in 10 liters of water and spray. |
| | धान पिकावर तुडतुडे यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यताआहे तरी त्यांच्या नियंत्रणासाठी अझाडीरेक्टीन ०.१५ % (१५०० पि.पि.एम.) @ ३० मि.ली. किंवा मेटारायझियम अनीसोपली ही जैविके २.५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर किंवा इमिडाक्लोप्रीड १७.८ एस. एल. @२.२ मि.ली. किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. @ २० मि.ली. किंवा फ्लोनीकॅमीड ५० डब्लु.जी. @ ३.० ग्रॅम किंवा इटोफेनप्रॉक्स १० % ई.सी. @ १० ते १५ मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| RICE | In the view of current rainy and cloudy condition, For management of stem borer and gall midge in paddy crop, apply Carbofuran 3% G or Fipronil 0.3 % G @ 25 kg or Phorate 10 % G @ 10 kg per hectare by maintaining water level 7 to 10 cm. Do not remove water from paddy bunds for 4 to 5 days. These pesticides should be used again after 30 days as required. |
| | धान पिकामध्ये खोडकिडा व गादमाशी च्या व्यवस्थापनासाठी कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार किंवा फिप्रोनिल ०.३ टक्के दानेदार @ २५ किलो ग्रॅम किंवा फोरेट १० % दानेदार १० किलो ग्रॅम प्रती हेक्टरी बांधी मध्ये ७ ते १० सेमी. पाणी असतांना वापरावे. बांधीमधील पाणी ४ ते ५ दिवस बांधीबाहेर काढू नये. आवश्यकतेनुसार ही किटकनाशके ३० दिवसांनी परत वापरावीत. |
| RICE | In the view of current rainy and cloudy condition, For management of bacterial leaf blight, spray Copper hydroxide 53.8% DF @ 30 gm + Streptocycline 1 to 1.5 gm per 10 liters of water. For management of sheath blight, spray Tebuconazole 25.9% EC @ 15 ml or Propiconazole 25% EC @ 10 ml or Hexaconazole 5 EC @ 20 ml by mixing in 10 liters of water. |
| | कडाकरपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी कॉपर हैड्रॉकसाईड ५३.८ % टक्के डी एफ @ ३० ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन @ १ ते १.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पर्णकोष करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेबूकोनॅझोल २५.९ ई.सी. @ १५ मि.ली. किंवा प्रोपिकोनॅझोल २५ ई.सी. @ १० मि.ली. किंवा हेक्झाकोनॅझोल ५ ई.सी. @ २० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| RICE | In the view of current rainy and cloudy condition, For management of grain discoloration in rice, while the crop is in flowering stage, spray any one of the following fungicides in the afternoon. Hexaconazole 4 % + Zineb 68% W.P. @ 20 to 25 gm or Tebuconazole 50% + Trifloxystrobin 25% WG. @ 4 gm per 10 liters of water. |
| | धान पिकामध्ये दाणे रंगहिनतेच्या व्यवस्थापनासाठी धान पिक फुलोरा अवस्थेत असतांना दुपारच्या वेळी खालील प्रमाणे कोणत्याही एका बुरशीनाशकाची फवारणी करावी. हेक्झाकोनॅझोल ४ % + झायनेब ६८% डब्लू.पी. @ २० ते २५ ग्रॅम किंवा टेबूकोनॅझोल ५०% + ट्रायफ्लोक्झीक्ट्राबिन २५% डब्लू.जी. @ ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून दुपारनंतर फवारणी करावी. |
| RICE | In the view of current rainy and cloudy condition, For management of false smut disease in rice, at 50 % flowering stage of paddy crop spray Copper hydroxide 77 % WP @ 25 gm per 10 liters of water in the afternoon. |
| | धान पिकामध्ये आभासमय काजळी च्या व्यवस्थापनासाठी धान पिकाच्या ५० % फुलोऱ्याच्या वेळेस कॉपर हायड्रास्काईड ७७ % डब्लू.पी. २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून दुपारनंतर फवारणी करावी. |
| GROUNDNUT | According to local weather condition, carry out harvesting and keep the harvested produce in safe and dry place. |
| | स्थानिक हवामान परिस्थिती बघून पिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| SOYABEAN | According to local weather condition, carry out harvesting and keep the harvested produce in safe and dry place. |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | स्थानिक हवामान परिस्थिती बघून पिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| PIGEON PEA (RED GRAM/ARHAR) | Due to congenial weather wilting/blight symptoms are observed in kharif pigeon pea, for control undertake drenching with copper oxychloride 50 % WP @ 25 g OR captan 75 % WP @ 20 g in 10 litres of water. For control of incidence of Phytophtora blight (stem rot or stem blight) observed in pigeon pea undertake spray of Fosetyl AL 80% WP@ 20 g in 10 litres of water. |
| | सततच्या ढगाळ वातावरणामुळे तूर पिकामध्ये आकस्मिक मर रोग दिसून आल्यास व्यवस्थापनाकरिता झाडाच्या मुळाजवळ कॉपर ओक्सीक्लोराईड ५० डब्लूपी २५ ग्राम किंवा कॅपटन ७५ डब्लूपी २० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी. फायटोप्थोरा खोडावरील करपा रोगाच्या व्यवस्थापनाकरिता फोसेटील एएल ८० टक्के २५ ग्राम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| TOMATO | In the view of present cloudy and rainy weather, if tomato leaf blight was noticed, spraying should be taken of Mancozeb 75 WP 25 gms or Copper oxychloride 50 WP 25 gms mix with in 10 liters of water. For control of thrips and white fly on tomato crop, spraying should be taken of Thimethoxam 25% WG 4 gm or Dimethoate 30% EC in 10 ml per 10 liters of water. For management of tomato fruit borer spraying should be taken quinalphos 25 EC 20 ml in 10 litre of water. |
| | सद्य स्थितीत ढगाळ आणि पावसाच्या हवामानामुळे टोमॅटो पिकामध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून असल्यास नियंत्रणासाठी मॅनकोझेब ७५ डब्लूपी. २५ ग्राम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी. २५ ग्राम, १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलकिडे आणि पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्राव्य दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## Horticulture Specific Advisory:

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| LINSEED | Dryland linseed should be sown in the first fortnight of October and irrigated linseed sowing till the first week of November (Varieties; NL- 97 & PKV NL-260). Before sowing, seed treatment should be done of Carbendazim 2 gm or Thirum 3 gm per kg of seed. After 3 hours, seed treatment should be done at the rate of 20 g of Azotobacter and 20 g of phosphorus solubilizing bacteria per kg of seed. |
| | कोरडवाहू जवस पिकाची (वाण- एनएल-९७ आणि पिकेव्ही एनएल- २६०) पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात तर बागायती पिकाची पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडयापर्यंत करावी. पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास कार्बेन्डाझीम २ ग्राम किंवा थायरम ३ ग्राम लाऊन बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर ३ तासांनी अॅझोटोबॅक्टर २० ग्राम व स्फुरद विरघळणारे जीवाणू २० ग्राम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. |
| SUNFLOWER | Carry out sowing of rain fed safflower (Bhima, AKS-207, PKV-Pink, Nari-6) during last week of September to first week of October to escapes the damage caused by aphid incidence. Seed treatment should be done of Azatobacter + PSB (200 gram/10 kg seed) and bio fungicide Trichoderma @ 4 g per kg seed is advisable. |
| | कोरडवाहू करडई ची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्या पर्यंत करावी जेणेकरून करडई पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव कमी राहतो. पेरणीपूर्वी बियाण्यास अझाटोबँक्टर + पीएसबी या जीवाणू संवर्धकाची ४ ग्राम प्रती किलो बियाण्यास बीज प्रक्रिया करावी. |
| ORANGE | In the view of present cloudy during this period there is attack of fruit sucking moth. To control the pest, spray neem oil @ 10 ml/litre water and destroy all the fallen fruits by burying in the pit. Poison baiting with 10 ml malathion mixed with 100 g jaggery and 100 ml mandarin juice in 900 ml water (two portion bottles per 25 trees). Follow clean cultivation and uproot all weeds in the orchard. Burn moist leaves of neem mixed with cow during and place the same in different locations to fumigate the citrus orchard. This practice will help to keep away the month from entering into the orchard. |
| | |

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| | संत्रा आणि मोसंबी पिकामध्ये रस शोषणाऱ्या पतंगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास पतंगांना आकर्षित करून मारण्यासाठी २० ग्राम मॅलेथिऑन किंवा ५० मिली डायझीओन २ लिटर पाण्यात २०० ग्राम गुळ किंवा २०० मिली फळांचा रस मिसळून विषारी द्रावण तयार करून एखाद्या प्लास्टिक ट्रे मध्ये ठेऊन यावर प्रकाशाचा सापळा लाऊन बगिचात ठेवावे. गळलेल्या फळांना एकत्र करून मातीत दाबून नष्ट करावे. त्याचबरोबर कडू लिंबाची ओलि पाने व गोवऱ्या याचा बगीचा मध्ये संध्याकाळी ६ ते १० पर्यंत धूर करावा. |
| BRINJAL | In the view of present cloudy and rainy weather, if the incidence of top shoot and fruit borer for management of spraying should be taken of cypermethrin 25 % EC 30 ml in 10 litre of water. |
| | सद्य स्थितीत ढगाळ आणि पावसाच्या हवामानामुळे वांगी पिकावर शेंडे आणि फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**Live Stock Specific Advisory:**

| Live Stock(Varieties) | Live Stock Specific Advisory |
|---|---|
| COW | For control of Lumpy Skin disease (LSD), Affected livestock shall be segregated from healthy livestock's. Movement (to and fro) of livestock from disease prone area shall be prohibited. Veterinary doctors treating infected livestock shall wear apron, wash hands with alcoholic sanitizers, foots-wears and apron shall be disinfected after treatment with hot water. The vehicle and premises were where affected livestock is kept along with other utensils shall be disinfected. For control of disease control of flies, ticks, mosquitoes shall be done. Spray Chemical/ herbal insecticides on animals body and in the premises. Due care shall be followed to avoid poisoning to livestock. |
| | लम्पी स्क्रीन रोग व्यवस्थापनासाठी रोगबाधीत पशुधन निरोगी पशुधनापासून विलगीकरण करावे अथवा त्यांना एकत्रित चरावयास सोडू नये. रोगबाधीत पशुधनाची ने-आण बंद करावी. तसेच साथीच्या काळात गावातुन/परिसरातुन गोठयास भेट देणा-यांची संख्या मर्यादीत करावी. बाधीत पशुधनाची शुश्रृषा करणा-या पशुवैदयक डॉक्टरांनी विशिष्ट पोषाख परिधान करावा. शुश्रृषा केल्यानंतर हात अल्कोहोल मिश्रीत सॅनिटायझरने धुवून टाकावेत. तसेच पादत्राने व पोषाख, गरम पाण्याने निर्जंतुक करुन घ्यावा. बाधीत पशुधनाच्या संपर्कामध्ये आलेले वाहन व परिसर तसेच इतर साहित्य निर्जंतुक करावे. रोग नियंत्रणासाठी रक्तपिपासू चावणा-या किटकवर्गीय माशा, डास, गोचीड यांचे निर्मुलन करावे. पशुधन व परिसरावरती रासायनिक/ वनस्पतीजन्य किटकनाशकांची फवारणी करावी. |

**Others (Soil / Land Preparation) Specific Advisory:**

| Others (Soil / Land Preparation) (Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
|---|---|
| GENERAL ADVICE | As the thunderstorm is predicted, if you hear thunder while working in the field, you should immediately take shelter in a safe place. Farmers should take necessary precautionary measures while spraying insecticide, fungicide etc. |
| | विजांचा कडकडाट पुर्वानुमानीत असल्याने शेतात काम करत असताना मेघगर्जनेचा आवाज आल्यास तत्काळ सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. शेतकरी बांधवांनी कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींची फवारणी करताना स्वतःची योग्य ती काळजी/खबरदारी घ्यावी. |
| GENERAL ADVICE | In areas where the cotton crop is ready for picking, the finished cotton should be picked and stored in a dry and safe place. Due to rains, sowing of rabi crop should not be rushed. Sowing of rabi crop should be done after 15th October. Seed treatment should be done before sowing. Care should be taken to ensure that water does not retain water in oranges, citrus, lemons as well as other orchards and vegetables. Vegetable and cardamom crops should be supported depending on the stage of crop growth. |

| Others (Soil / Land Preparation) (Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
| --- | --- |
| | ज्या भागात कापूस पिक पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे तयार कापसाची वेचणी करून कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. पावसाच्या अनुशंघाने रबी हंगामातील पिकाच्या पेरणीला घाई करू नये. १५ ऑक्टोबर नंतर रबी हंगामातील पिकाची पेरणी करावी. तसेच पेरणीपूर्वी बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. संत्रा, मोसंबी, लिंबू तसेच इतर फळबागा आणि भाजीपाला पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच पाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना कराव्यात. भाजीपाला आणि वेलवर्गीय पिकाला पिक वाढीची अवस्था बघून आधार द्यावा. |